# गरीब, वंचित मुलांनी साजरी केली दिवाळी

पुणे : कर्वेनगरमधील सहजानंद सोसायटीच्या आसपास राहणाऱ्या वस्तीतील गरीब, वंचित मुलांबरोबर हिंदू महिला सभेच्या सदस्यांनी दिवाळी साजरी केली. आस फाउंडेशनच्या अनघा ठोंबरे यांच्या पुढाकाराने कार्यक्रम पार पडला.

यावेळी मुलांना दिवाळी फराळ पदार्थांबरोबर जीवनावश्यक वस्तू व खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी हिंदू महिला सभेच्या सुप्रिया दामले, स्मिता नातू, मृणाल गोडबोले, नीला मोघे, प्राची सप्रे व सुधा लेले या सदस्या सहभागी झाल्या होत्या. संस्थेच्या वतीने दरवर्षी अशा प्रकारे विविध संस्थांमध्ये सामाजिक दिवाळी साजरी करण्यात येते. समाजातील भिक्षेकरी, वंचित, उपेक्षित समाजातील मुलींसाठी रेणू गावस्कर यांच्या पुढाकाराने चालवण्यात येत असलेल्या 'घरटं' या निवासी प्रकल्पातील मुलींचे कुमारिकापूजन करत त्यांना मदतदेखील करण्यात आली.